# Khed News : 'मुलाचा खेळण्याचा हक्क' अंतर्गत मांजरे विद्यालयात विविध खेळांचे आयोजन

By **Himanshu MPC News** On **डिसेंबर 20, 2021** ठळक बातम्या पिंपरी चिंचवड




**एमपीसी न्यूज – मुलांना सर्व भेद विसरूण एकत्र खेळता यावे, या हेतूने वसंतराव मारुतीराव मांजरे विद्यालय, मांजारेवाडी येथे 'मुलाचा खेळण्याचा हक्क' अंतर्गत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. टेरे डेस होम्स आणि वर्क फॉर इक्वॅलिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.19) या उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुलांनी उत्सहाने विविध खेळात सहभाग घेत मौजमजा केली.**

कार्यक्रमात मुलांना खोखो कबड्डी, रिले या खेळाव्यतिरीक्त कराटे, कसरतीचे खेळ अशा खेळांचे प्रात्यक्षिक दाखवले व प्रोत्साहित केले. यावेळी अंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू प्रज्वल दाभाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, रोहिदास शिर्के, प्रगती शिर्के, नितेश चव्हाण आणि वैभवी पिंपळे आदी मान्यवर उपस्थित होते.

'मुलांच्या मनात एकमेकांविषयी आदर निर्माण व्हावा. मुलींवर होणारी हिंसा, भेदभाव कमी होऊन सुदृढ समाजाची निर्मिती व्हावी हा उपक्रमाचा उद्देश आहे. वर्क फॉर इक्वॅलिटी ही संस्था शिरोली, खरपुडी खुर्द, मांजरेवाडी, होलेवाडी, रेटवडी, निमगाव या गावातील आणि आदिवासी वाड्या वस्त्यावरील 300

बालगोपाळांसोबत नियमित मैदानी खेळ घेते. मुलांचा खेळण्याचा उत्साह वाढवा यासाठी गावात स्पोर्ट क्लब देखिल स्थापन करण्यात आला आहे.' अशी महिती वर्क फॉर इक्वॅलिटी संस्थेच्या संस्थापिका प्रभा विलास यांनी दिली.

निलांबरी कांबळे, दिव्या गिरी, सूरज कांबळे, रसिका गावडे आणि संजीवनी कांबळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

children news | children rights to play | khed news | latest marathi news | Latest Update | Local News | marathi news | mpc | mpc latest news | MPC news | mpc news local | pimpri-chinchwad | PimpriChinchwad | Top Marathi news | Top News | trending news | एमपीसी न्यूज | ताज्या बातम्या | मराठी बातम्या | लेटेस्ट मराठी बातम्या

**Leave a comment**




ठळक बातम्या पुणे

# Pune News : सात देशांचा सहभाग असलेल्या 'पॅनएक्स – 21'चे पुण्यात उद्घाटन

By **Himanshu MPC News** Last updated **डिसेंबर 20, 2021**

**एमपीसी न्यूज – भारत, बांगलादेश, नेपाळ, भूतान, म्यानमार, श्रीलंका आणि थायलंड या सात देशाचा सहभाग असलेल्या 'बिमस्टेक' राष्ट्रांच्या 'पॅनएक्स – 21'चे आज (दि.20) पुण्यात उद्घाटन झाले. बिमस्टेक राष्ट्रांसाठी आपत्ती व्यवस्थापन बाबींमध्ये सामायिक क्षमता विकसित करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. 20 ते 22 डिसेंबर असे तीन दिवस हा सराव कार्यक्रम असेल.**

लष्करप्रमुख, जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी आपल्या संदेशात आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व विशद करत, अडचणीच्या काळात एकमेकांना सहकार्य करण्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. या सरावादरम्यान अधिसूचना, तयारी आणि प्रतिसाद यांचे पुनरावलोकन करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे लष्करप्रमुख म्हणाले.

आजचा परिसंवाद तीन सत्रांमध्ये पार पडला. यामध्ये आपत्ती निवारण आणि व्यवस्थापन क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांनी उपस्थितांना संबोधित केले. पहिल्या सत्रात कोरोना मधून मिळालेल्या संकल्पना, मूलभूत गोष्टी यासह महामारीच्या प्रतिसादाशी संबंधित विविध वैद्यकीय पैलूंवर चर्चा करण्यात आली. दुस-या सत्रात महामारीच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक आपत्तीला प्रतिसाद देण्याच्या यंत्रणेवर चर्चा करण्यात आली. तिसऱ्या सत्रात प्रादेशिक आपत्तींना देशांतर्गत प्रतिसादात सशस्त्र दलांचे एकत्रीकरण याबाबत माहिती देण्यात आली.

latest marathi news | Latest Update | Local News | marathi news | mpc | mpc latest news | MPC news | mpc news local | Panex -21 | pimpri-chinchwad | PimpriChinchwad | seven countries | Top Marathi news | Top News | trending news | एमपीसी न्यूज | ताज्या बातम्या | मराठी बातम्या | लेटेस्ट मराठी बातम्या

Leave a comment




ठळक बातम्या   पिंपरी चिंचवड